**नि.फौ.ख.क्र. २१४/२०२२**
**निशाणी क्र. ७५**

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. ४ यांचा सरतपास शपथेवर.**

**नावः** भिवा बापू लोंढे,
**वयः** ७५ वर्षे, **व्यवसायः** मजुरी,
**पत्ताः** मौजे लासुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु**

दिनांक ३०/०८/२०२१ रोजी मला पोलीसांनी वालचंदनगर पोलीस ठाणेत बोलाविले होते. आम्ही पोलीस ठाणेतून कोठेही गेलो नाही. पोलीसांनी मला सही करणेस सांगितली, मी सही केली. मी लिहिलेल्या कागदावर सही केली होती. माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा झालेला नव्हता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यामधील मजकूर मला माहित नाही. त्यावर माझी साक्षीदार क्र. २ म्हणून सही आहे, सहीस **निशाणी क्र. ७६** देण्यात येते.

(सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी मदत करीत नसल्याने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. विनंतीवरून भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे परवानगी देण्यात येते.)

**उलटतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत**

२. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला आणि दुसरे पंच अजित पवार याला सकाळी ९:०० वाजाता चिखली गावच्या हद्दीत फिर्यादी आणि आरोपी यांच्या सामाईक बांधावर बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मधूकर जाधव हे घटनास्थळ दाखवित होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस तेथे घटनास्थळ पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा माझ्यासमक्ष झाला आणि मी वाचून, समजून, उमजून त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहिता, वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला सही करणेकरिता कोणताही धाक दाखविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविणेसाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**नि.फौ.ख.क्र. २१४/२०२२**
**निशाणी क्र. ७५**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. एस. एस. टिळेकर यांचे मार्फत शपथेवर</u>**

उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2025.04.02 17:49:33 +0530

ठिकाण: इंदापूर (जे. एन. भस्मे)
दिनांक : ०१/०४/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.